## नि.क्र. ३९ वरील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल केले नाहीत. त्यामुळे अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

३. वादी विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीचा कब्जा व नुकसानीचे भाडे प्रतिवादीकडून मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये वादीचे कथन असे की, दाव्याचे सरनाम्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे नाव नजरचुकीने अनिल भगवंत कुलकणी व प्रतिवादी क्र. ५ अशोक भगवंत कुलकर्णी असे नमूद झाले आहे. दाव्याचे सरनाम्यामध्ये सदर प्रतिवादी क्र. ४ अनिल दिगंबर कुलकर्णी व प्रतिवादी क्र. ५ अशोक दिगंबर कुलकर्णी तसेच दावा कलम २ मधील विठ्ठल दिगंबर कलकर्णी याऐवजी विठ्ठल भगवंत कुलकर्णी व भगवंत दिगंबर कुलकर्णी याऐवजी दिगंबर भगवंत कुजकर्णी असे नमूद होणे आवश्यक आहे. सदर नावामधील चूक ही नजरचुकीने झालेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या नावाबाबतची दुरुस्ती दाव्याच्या सरनाम्यामध्ये होणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती साधारण स्वरुपाची आहे. दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होत नाही. प्रतिवादीचे डिफेन्सवर काही परिणाम होत नाही. सबब वरीलप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती वादीने केली आहे.

५. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, दावा हा दावा मिळकतीचा कब्जा मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत वादी मागणी करीत असलेली दुरुस्तीची गरज नजरचुकीने निर्माण झाली असून ती दाव्याच्या या टप्प्यावर मंजूर करणेस कायदेशीर बाधा नाही. दुरुस्ती केल्यास दावा गुणदोषावर निर्णायक करण्यास सहाय्य होणार आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती मंजूर करणे उचित होईल.

६. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे पक्षकार दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर वादपत्रामध्ये दावा निर्णायक करण्याकरीता आवश्यक ती असलेली दुरुस्ती करु शकतात. वादीची दाव्यातील मागणी ध्यानात घेता सदर दुरुस्ती दावा गुणदोषावर निर्णायक

करण्याकरीता आवश्यक आहे. तसेच सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीच्या हितास कोणताही बाध निर्माण होत नाही. तसेच सदर दुरुस्ती मंजूर करण्यास कोणताही कायदेशीर बाध असल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे उभयपक्षातील वाद कायमस्वरुपी संपविण्याकरिता तसेच प्रकरणांचे अनेकीकरण रोखण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे जरुरीचे आहे. सदर अर्ज मंजूर केल्याने दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट दोन्ही पक्षांचे दावा मिळकतीतील हक्क व हितसंबंध निर्णायक करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप त्यातील मागणी व प्रस्तुत अर्जातील वादी मागणी करत असलेली दुरुस्ती ध्यानात घेता न्यायाचे हित जोपासण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित होईल. अशा परिस्थितीत सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे एकंदरीत सर्व कारणमीमांसा ध्यानात घेता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी दाव्यात करु इच्छीत असलेली दुरुस्ती त्यांनी पुढील तारखेपर्यंत करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादींना द्यावी.

सही/–

(श्रीमती रेवती पी. बागडे)

दिनांक – १९/०९/२०२५.

५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बार्शी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. Revati P. Bagade, 4th Jt. Civil Judge, J.D.& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19/09/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 23/09/2025 |